**L. A. BILL No. XVII OF 2022.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६२ चा महा. ५.

२०२२ चा महा. अध्या. ८.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक ४ ऑगस्ट २०२२ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२२ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ४ ऑगस्ट २०२२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मध्ये, " पंचाऐंशीपेक्षा अधिक नसतील आणि पंचावन्नपेक्षा कमी नसतील इतके " या मजकुराऐवजी, " पंचाहत्तरापेक्षा अधिक नसतील आणि पन्नासपेक्षा कमी नसतील इतके " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६२ चा महा. ५.

प्रक्रिया रद्द करणे.

**३.** मुख्य अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम, काढलेल्या अधिसूचना किंवा काढलेले आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा, यथास्थिती, राज्य शासनाने,— २०२२ चा महा. .

(एक) जिल्ह्याची, निवडणूक विभागांमध्ये विभागणी करण्याची आणि जिल्ह्यामधून निवडून द्यावयाच्या सभासदांची संख्या निर्धारित करण्याची ; किंवा

(दोन) मतदार विभागाची, निर्वाचक गणांमध्ये विभागणी करण्याची ; किंवा

(तीन) जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील सभासदांच्या जागांच्या आरक्षणाची,

प्रक्रिया सुरू केली असेल किंवा पूर्ण केली असेल तेथे, अशी प्रक्रिया रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार नव्याने करण्यात येईल.

**४.** (१) जर या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

२०२२ चा महा. अध्या. ८. **५.** (१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७.]**

**[महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ संभाजी शिंदे,**
मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.